## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ एप्रिल २०१३

## अधिसूचना

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५.**

क्रमांक केमाअ.२०११/४४५/प्र.क्र. २५०/सहा.—माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा ५२) याच्या कलम २७ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २००५ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, महाराष्ट्र माहिती अधिकार (सुधारणा) नियम, २०१३ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २००५ (यात यापुढे ज्याचा " मुख्य नियम " असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या नियम ३ मध्ये, " बँकेच्या धनादेशाद्वारे " या मजकुराऐवजी " बँकेच्या धनादेशाद्वारे किंवा भारतीय पोस्टल ऑर्डरद्वारे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

३. मुख्य नियमांच्या नियम ४ मध्ये,—

(एक) पोट-नियम (१) मध्ये,—

(क) " बँकेचा धनादेश " या मजकुरानंतर " किंवा भारतीय पोस्टल ऑर्डर " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (ब) मध्ये, " त्यानंतरच्या प्रत्येक पंधरा मिनिटांकरिता (किंवा त्याच्या भागाकरिता) " या मजकुराऐवजी, " त्यानंतरच्या प्रत्येक तासाकरिता (किंवा त्याच्या भागाकरिता) " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (ब) नंतर, आणि परंतुकाच्या अगोदर, पुढील खंड दाखल करण्यात येईल,—

" (क) नमुन्यांसाठी किंवा प्रतिकृतींसाठी, प्रत्यक्ष खर्च किंवा किंमत ; " ;

(दोन) पोट-नियम (२) मध्ये, " बँकेचा धनादेश " या मजकुरानंतर " किंवा भारतीय पोस्टल ऑर्डर " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

४. मुख्य नियमांच्या नियम ५ मध्ये,—

(क) पोट-नियम (१) मध्ये, " बँकेचा धनादेश " या मजकुरानंतर, " किंवा भारतीय पोस्टल ऑर्डर " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) पोट-नियम (२) मध्ये, " बँकेचा धनादेश " या मजकुरानंतर, " किंवा भारतीय पोस्टल ऑर्डर " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पी. एस. मीना,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 23rd April 2013

*NOTIFICATION*

RIGHT TO INFORMATION ACT, 2005.

No. KMA. 2011/CR. 250/VI.—In exercise of the powers conferred by sub-section (2) of section 27 of the Right to Information Act, 2005 (52 of 2005), the Government of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Right to Information Rules, 2005, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Right to Information (Amendment) Rules, 2013.

2. In rule 3 of the Maharashtra Right to Information Rules, 2005 (hereinafter referred to as " the principal Rules ") for the words "banker's cheque payable" the words " banker's cheque or Indian Postal Order payable " shall be substituted.

3. In rule 4 of the principal Rules,—

(*i*) in sub-rule (1).—

(*a*) after the words " banker's cheque " the words " or Indian Postal Order " shall be inserted ;

(*b*) in clause (*B*), for the words " fifteen minutes (or fraction thereof) thereafter " the words " subsequent hour (or fraction thereof) ; " shall be substituted ;

(*c*) after clause (*B*) and before the proviso, the following clause shall be inserted namely,—

" (C) actual cost or price for samples or models ; " ;

(*ii*) in sub-rule (2) after the words " banker's cheque " the words " or by Indian Postal Order " shall be inserted.

4. In rule 5 of the principal Rules,—

(*a*) in sub-rule (1), after the words " banker's cheque " the words " or Indian Postal Order " shall be inserted ;

(*b*) in sub-rule (2), after the words " banker's cheque " the words " or Indian Postal Order " shall be inserted ;

By order and in the name of Governor of Maharashtra,

P. S. MEENA,
Additional Chief Secretary
to Government.